
2019-20

48B

ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION
## RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

२०१९-२०

डॉ. अंकुश कुमार चव्हाण

IMPACT FACTOR 6.014

ISSN 2250-169X

*International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# VISION RESEARCH REVIEW

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XVIII, Vol. - III

Year - IX, Bi-Annual(Half Yearly)

(Dec. 2019 To May 2020)

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Professor & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**SPECIAL EDITOR**

Dr. E. Sivanagi Reddy
'Sthapathi'
Dept of Archaeology & Museums,
Hyderabad (A.P.)

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Sachin Napate
Pune, Dist. Pune .M.S.

Verena Blechinger Talcott
Director, Dept. of History
& Cultural Studies,University of Barlin.
Bariln. (Jermany)

Michael Strayss,
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

Dr. Deelip S. Arjune
Professor, Head, Dept. of History
J. E. S. Mahavidyalaya,
Jalna, Dist. Jalna (M.S.)

Dr. Nilam Chhangani
Dept. of Economics,
S.K.N.G. College,
Karanja Lad, Dist. Sashim(M.S.)

Dr. Rajendra R. Gawhale
Head, Dept. of Economics,
G. S. College,
Khamgaon, Dist. Buldana (M.S)

**DEPUTY EDITORS**

Dr. Rajendra Ganapure
Professor,Head, Dept. of Economics,
S. M. P. Mahavidyalaya,
Murum, Dist. Osmanabad (M.S.)

Dr. B. K. Shinde
Professor, Head, Dept. of Economics,
D. S. M. Mahavidyalaya,
Jintur, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Vijay R. Gawhale
Head, Dept. of Commerce,
G. S. Mahavidyalaya,
Khamgaon, Dist. Buldana (M.S.)

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

Dr. Mahadeo S. Kamble
Dept. of History
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Dr. S. R. Patil
Professor, Dept. of Economics,
Swami Vivekanand Mahavidyalaya,
Shirur Tajband, Dist. Latur(M.S.)

**CO - EDITORS**

Dr. Allabaksha Jamadar
Professor, Head, Dept. of Hindi,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Murlidhar Lahade
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed.(M.S.)

Dr. Shyam Khandare
Dept. of Sociology,
Gondawana University,
Gadhciroli, Dist. Gadchiroli (M.S.)

Dr. M. Veeraprasad
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, Dist. Anantpur (A.P.)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 -241913**
9423346913 / 7276301000
9637935252 / 9503814000

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published By :**
**Jyotichandra Publication**
Latur, Dist. Latur - 413531. (M.S.)

Price : ₹ 200/-

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Worker's Participation in Management<br>**Dr. Dadasaheb Jogdand** | 1 |
| 2 | Challenges to Higher Education<br>**C. P. Kothawale** | 8 |
| 3 | Studies on Effect of Slaughtering Age on Chemical Composition of Goat Meat (Chevon)<br>**G. S. Biradar, Dr. L. M. Karanjkar** | 14 |
| 4 | Relationship between Education and Economics<br>**D. P. Kamble** | 22 |
| 5 | Evaluation of Bacteriological quality of Ice Creams and Milk Shakes Prepared and Sold by Street Vendors in Omerga City Maharashtra, India<br>**S. M. Dulange, S. B. Mali** | 25 |
| 6 | शशिप्रभा शास्त्री और उनका उपन्यास साहित्य<br>**डॉ. सूर्यकांत दळवे** | 44 |
| 7 | बालकुपोषणाची समस्या आणि उपाय<br>**नलिनी अनिल बोडखे** | 50 |
| 8 | बंजारा जातीच्या दु:ख-वेदनेचा जमाखर्च मांडणारा 'तांडा'<br>**डॉ. अंकुशकुमार चव्हाण** | 56 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नेल्सन मंडेला यांच्या कार्याचा तुलनात्मक अभ्यास<br>**डॉ. रब्बानी आर. सय्यद** | 63 |

8

# बंजारा जातीच्या दु:ख-वेदनेचा जमाखर्च मांडणारा 'तांडा'

डॉ. अंकुशकुमार चव्हाण

## Research Paper - Marathi

भटक्या-विमुक्त जाती-जमातीमध्ये प्रगती पथावर असलेली तरीही दु:ख,दैन्य, दारिद्र्य आणि अगतिकता यांच्या खाईत सापडलेली एक जमात म्हणजे 'बंजारा' ही होय. या जमातीला थोडीशी प्रगत म्हणण्याचे कारण की, या जमातीच्या नशिबी इतर भटक्या-विमुक्त जमतीसारखी सतत भटकंती आलेली नाही. तसेच या जमातीमध्ये थोड्याफार प्रमाणात शेती उद्योग करणारे लोकही दिसून येतात. ही जमात भटक्या-विमुक्तांपैकी असून प्राचीन काळात उंटावरून मीठ वाहण्याचा उद्योग करीत होती. त्यांचे मूळस्थान राजस्थान सांगितले जाते. आज ही जमात महाराष्ट्रात प्रत्येक खेड्यापाड्यात आणि नागरी भागातून दिसून येते. या समाजाचे दु:ख, यातना, दैन्य आत्माराम कनीराम राठोड यांनी 'तांडा' या आत्मकथनातून पहिल्यांदा मांडले. या आत्मकथनात केवळ आत्माराम कनीराम राठोड यांच्या जीवनाची हकीकत नाही तर लेखक जन्मला आणि जगला त्या तांड्यातील संपूर्ण जीवनाचीच हकीकत निर्भयपणे येथे कथन झालेली आहे. हे केवळ एका तांड्याचे अंतर्विश्व नाही तर सर्वच तांड्याचे ते प्रातिनिधिक भावविश्वही आहे. हे लेखन केवळ समकालातील जमाखर्च या 'तांड्यातून' मांडला गेला आहे. लेखकाच्या तांड्याची ही ऐतिहासिक कामगिरी अधोरेखित करण्याची आज गरज आहे. तांड्यातील संस्कृतीचे, तेथील दु:खाचे, मानवी प्रवृत्तीचे दर्शनही या आत्मकथनातून लेखकाने घडविले आहे. तांड्यामध्ये वास्तव्य करणारे लोक अनेक प्रश्नांना तोंड देत आपले जीवन सामान्यपणे जगतात. एकमेकांवर भरभरून प्रेम करणारा तांडा कोणत्याही मनामध्ये मायेचे घर अगदी सहजपणे करू शकेल एवढा कणवाळू आहे. पण उत्तरोत्तर तांड्यामध्ये बदल होऊ लागला. माणसांची एकमेकांवरची माया-मर्जी खलन होत होती. तांड्यातील माणसे मात्र आपली जात, अंधश्रद्धा, स्वार्थी वृत्ती यामध्ये पार बुडालेली होती. लेखक मात्र हे

बालपणापासून अगदी सूक्ष्म निरीक्षण करतो. शालेय जीवन, त्यामध्येच तांड्यातील संस्कृतीचा बालमनावर होत जाणारा परीणाम हा लेखकाच्या जडण-घडणीमध्ये अगदी मौलिक भूमिका पार पाडतो. मित्रांच्या सोबत तांड्यामध्ये, शेतीमध्ये मुक्तपणे विहार करणारा लेखक सर्जनक्षमपणे सर्व पाहतो. तांड्यातील जातपंचायत, दारू व मटन यामध्ये बुडालेला समाज हा अगदी वेगळाच भासतो आहे. त्याचबरोबर तांड्यातील सण-उत्सव, रूढी, परंपरा याचे एक वेगळेपणच लेखक आत्मकथनाच्या माध्यमातून चित्रित्र करतो. दैववाद आणि रूढी परंपरा मात्र तांड्याला प्रदीर्घ अशी लाभलेली आहे. वसंतराव नाईकांच्या विचाराचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ही तांड्यातील माणसे आपले जीवनक्रमण करतात. शिक्षण क्षेत्रात चाललेला सावळा गोंधळ लेखकांनी तांड्यातील संस्थाचालकाच्या अनुषंगाने पाहिला आहे. संस्थाचालक सर्वसामान्य माणसांची कशा स्वरूपात पिळवणूक करत आहेत याचे विदारक चित्रण 'तांडा'मधून उभे राहते. तांड्यातील माणसांच्या ठायी असलेली इनामीवृत्ती हीच तांडा संस्कृतीचे एक आगळे-वेगळे वैशिष्ट्य आहे. आपल्याच जीवनाविषयीचा उद्वेग लेखकाने या आत्मकथनातून केलेला आहे. तांड्यात माणसे मालकाच्या जमिनी कसत असायचे. पण काळाच्या ओघात या तांड्यामध्ये घृणास्पद राजकारण प्रविष्ठ झाले. काळासोबत 'तांडा' बदलतो आहे की, तांड्यासोबत काळ बदलतो आहे हे मात्र लेखकाला कळत नाही.

तांड्यातील संस्कृती ही नायकप्रधान आहे. ही माणसे देव-धर्म व अशा स्वरूपाच्या अंधश्रद्धेमध्ये कायम बुडालेली दिसून येतात. तसेच इजारदाराची शेती करून आपला उदरनिर्वाह करतात. अशा या तांड्याचे चित्रण करताना लेखक म्हणतो- ''नायकाच्या त्या बुद्धिशून्य परंपरांच्या चाकोरीत सगळा तांडा देव-धर्म, पूजा-अर्चा, नवस-सायास आणि न पिकणाऱ्या शेतीवर मिळणारे सावकारी कर्ज या सर्वांच्या आधारे जगत-तगत होता.'' या तांड्यात राहणारी बहुसंख्य माणसे ही अंधश्रद्धेवर विश्वास बाळगणारी आहेत. भूत, देव अशा भ्रामक संकल्पनेवर ते विश्वास ठेवतात. देव-धर्म याविषयी कोणीही काही टिप्पणी दिली तर तांड्यातील माणसांना ते सहन होणारे नाही. चटकी करणारी हुनकी आहे म्हणून तिला तांड्यातील माणसे उद्ध्वस्त करतात. हुनकीचे चित्रण करताना लेखक म्हणतो- ''असल्या अफवा सत्य व्हायला आपल्याकडे काय वेळ लागतो ? मुळीच नाही. मग एखाद्याला जेवताना हुनकीने पाहिले की, तिचे तान्हे रडरड रडू लागे. असल्या एक ना दोन हजार पुराव्यावरुन हुनकी चेटकीण असल्याचे त्यांच्या मनात सिद्ध झाल्यावर, दरेक आजाऱ्याच्या स्वप्नात जी जाऊ लागली आणि त्यापायी तिच्या अब्रूची घरोघर धिंड निघू लागली'' तांड्यातील माणसे अफवांवर विशास ठेवून हुनकीचे जीवन संपवण्यासाठी मागे पुढे पाहत नाहीत.जाती व्यवस्थेचा पगडा असलेला 'तांडा' या व्यवस्थेतील काही जातींना शुद्र समजून आजही जवळ घेत नाही. ही परंपरा मात्र

तांड्याने प्रस्थापित व्यवस्थेकडून स्वीकारलेली दिसते. या तांड्यातील माणसांच्या मनामध्ये जाती-व्यवस्थेची मुळे खोलवर रूजलेली आहेत. ढोराची सागुती खातात म्हणून बुद्धांना, मातंगांना ताटात जेवण न देणारे तांड्यातील माणसे मात्र मुस्लिमांना एका ताटात घेऊन जेवतात. ही खंत करताना लेखक म्हणतो- ''ढोर खायचे म्हणून बुद्धांना कोणी भांडे देत नाही. आपल्या ताटात जेऊ देत नाही. मग मुसलमानाला तुम्ही कसं जेऊ दिलं आपल्या ताटात ? ''दिना रे ! आपण राजपूत कुळाचे. शरण आलेल्यांना मरण द्यायचे नाही'' ''पण या, उद्या मांग आला एखादा तुला शरण, तर देशील त्याला ताटात ?'' ''छट् कुठे मांग.....कुठे महार........आणि कुठे मुसलमान ! राहू दे तुला कळायचं नाही ते बापजाद्यांनी सांगितलं तसं वागावं आपण.''

बापजाद्यांची संस्कृती सांभाळणारे तांड्यातील लोक आहेत.या संस्कृतीचे आणि परंपरेचे जतन त्यांना करावेसे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकूणच मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी आपले जीवन वाहून घेतले. पण तांड्यातील माणसांना मात्र बाबासाहेब कळू शकले नाहीत. उलट बाबासाहेबांना यांनी धेड म्हटले त्याचे चित्रण करताना लेखक म्हणतो -''मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्या म्हणून त्याने सत्याग्रह केला होता म्हणतात.....'''थू ..,त त्याच्या....' बा खवळून म्हणाले असे केसो म्हणतो- ''भोसडीचा कुठला धेडबियाचा आला माझ्या कुळाला? लोक नाईक साहेबांच्या पाठी जीव देतात आणि..... आणि हा कुत्र्याच्या आंडासारखा बाहेर पडून राहतो.''आहे काही लाज शरम त्याला? अरे मरावं तर इंदिरा गांधीसाठी, आर्वीला लोक गोळ्या खाऊन गेले तसं मरावं. पण हा धेडगेल पोटचा माझ्या अवलादीत पैदा झाला. त्या गाढवाला सांग माझ्या घरी पाय ठेवायल येऊ नको....''[११७] तांड्यातील माणसामध्ये जातीविषयीचा दृष्टिकोन कसा खोलवर रूजलेला आहे, याचे प्रत्यंतर येथे येते. लेखक मात्र परिवर्तनाच्या विचाराने भारावून जातो. बाबासाहेब आंबेडकर हेच आपले उद्धारकर्ते आहेत याची साक्ष या मनाला पटते. म्हणून लेखकाचे असे वागणे पाहून तांड्यातील लोक नावे ठेवतात. याविषयी लेखक म्हणतो- ''यानंतर मी जेव्हा तांड्यात आलो तेव्हा पोरसोरं मला, 'येत धेडीया,ये दलित'' म्हणून वाकुल्या दाखवत खिदळत. आता तांड्यात आत्माराम नावाचे खूप लोक झाले आहेत. तरी पण ''धेडीया दलित आत्मारामचे घर कुठले'' असे तुम्हीं विचारले तर कोणालाही माझं घर शोधायला श्रम पडणार नाहीत.''[११८]

तांड्यातील जातीय विस्फोट लेखकाच्या मनाला अगदी अंतर्मुख करून जातो. तांड्यातील आलेली राजकीय झालर हीच तांड्याचे खलन करीत आहे. वेगवेगळ्या राजकीय विचारसरणी तांड्यातील वातावरण अगदी गढूळ करत होत्या. तांड्यामध्ये एकमेकांविषयी असलेलं आदरातिथ्य जवळपास लुप्त पावायला लागले होते. ज्या माणसांच्या कृपाशीर्वादामुळे राजकीय पुढारी मंत्री होत

होते त्यांना हा दारिद्र्यात खितपत पडलेला समाज केव्हाही दिसला नाही. कोट्यवधी रुपये खर्च करून मोठ-मोठे बंगले बांधले पण गरीब माणसे आपले पोटसुद्धा भरू शकत नव्हते याविषयीचे चित्रण करताना लेखक म्हणतो-''उद्या स्वातंत्र्याची एकेचाळीस वर्षे पूर्ण करत असलेल्या माझ्या समाजाला पोट भरण्याचीही अक्कल सुचू नये ? धन्य आमचे स्वातंत्र्य आणि धन्य या लोकांकडून वर्गणी जमवून पोट भरणारे, बंगले बांधणारे पुढारी ! त्याहीपेक्षा धन्य धन्य या उपाशी लोकांच्या गठ्ठामतांवर मंत्रिपद भूषविणारे हरामखोर !''[११९]राजकीय नेत्यांची रंगबदलवृत्ती मात्र जवळ गेल्याशिवाय कोणालाही कळत नाही पण 'तांडा' मात्र निशंकपणे त्याच्यावर विश्वास ठेवून होता. लेखक मात्र राजकीय पुढाऱ्यांना जवळून ओळखत होते. महागडे जेवण लोकांच्या समोर नाकारणारे नेते मात्र सर्व जण गेल्यानंतर रात्री बारा वाजता त्या जेवणाचा फडशा पाडतात. ही सरड्यासारखी वृत्ती लेखकांनी उलगडून दाखवली आहे ती अशा स्वरुपाची आहे.''पण हा ऑर्डरचा खाना काय करायचा? आम्ही चुकलो असलो तरी गोड करून घ्या.'' ''छे ! छे!! ते शक्यच नाही. भेळ आणा भेळ आणि, हा खाना?....ते मी कुणा गरीबगुरीबाला देऊन येईन. त्याची तुम्हाला काळजी नको.''जमलेले लोक गरीब समाजाच्या या थोर कार्यकर्त्याचे गरिबीतले मोठेपण पाहून भारतीय जनता अशीच नतमस्तक झाली असेल ! नाही ? रात्री १२ ला बैठक संपली. सगळे निघून गेले. त्यानंतर सानावतजींनी अख्खा कोंबडा, मलई, दही, भात आणि तीन पराठे फस्त केले. हो तीनच. त्या चारपैकी एक पराठा मला मिळाला होता मुर्ग्याच्या दोन-तीन फालतू पीससह!'' बंजारा या समाजातील माणसांच्या समोर वसंतराव नाईकांचा आदर्श असलेला आपणास या आत्मकथनाच्या माध्यमातून दिसतो. वसंतराव नाईक ज्या वेळी मंत्री झाले त्या वेळेस एकूणच तांड्यातील बंजारा समाज मनोमन सुखावला होता. पण याची खंत मात्र लेखकाला वाटत होती. लेखक मनाची खंत व्यक्त करताना म्हणतो-''वसंतराव नाईकांच्या लोभसवाण्या उमद्या राजकीय कर्तृत्वाला आलेले हे घृणास्पद फेळ म्हणजे तांड्याची दिशाभूल करणारे, अमृत लाटण्यासाठी प्रसंगी बांगड्या भरणाऱ्या कावेबाजीचे पुजारी, एक नवे सोंग घेऊन आले. हे ताड्याचे केवढे दुर्दैव!'' एकूण समाज व्यवस्थेचा विचार केला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रस्थापित व्यवस्थेने स्वीकारले नाही. मागावसर्गीयांमधल्या बऱ्याच जातींनीसुद्धा बाबासाहेबांना स्वीकारले नाही पण वैचारिक अधिष्ठान असलेल्या बाबासाहेबांना मात्र लेखकांनी खुल्या मनाने स्वीकारले आहे. त्यांच्याविषयी आदरभाव ठेवला आहे. त्यांच्या कार्याविषयीचा स्वाभिमान त्यांना आहे. हा स्वाभिमान व्यक्त करताना लेखक म्हणतो- ''त्यात त्याचा असला नसला दोष पोटी घालून वर्तमानात तुम्ही तांड्यासाठी काय करणार आहात ? निदान स्वतंत्र भारतात धर्म नसलेल्या तीन कोटी जिवात नवधर्म देणारा एकही डॉ. आंबेडकर झाला नाही ? काही असो, पोहऱ्याला दर

रामनवमीला सवारी निघत असते. तांडयातून जाऊन ही सवारी धरायची म्हणजे रात्री एक-दीड वाजता निघणे भाग ! त्यानंतर पोहऱ्याला पोचून काय उपयोग ? सवारी निघून गेल्यावर काय नुसती जत्रा पाहायलय जायचं ?''

राजकीय पुढाऱ्याकडून शिक्षणसंस्था मंजूर करून घेऊन त्याचा समाजातील बरेच संस्थापक राजकारणासाठी कसा दुरूपयोग करत आहेत याचे चित्रण लेखकाने केले आहे. समाजामध्ये शैक्षणिक प्रगती करण्यासाठी शिक्षणसंस्था काढण्याऐवजी आपलीच स्वार्थाची पोळी भाजून घेण्यासाठी काढल्या जात आहेत. यामध्ये एकूण समाजाचे शैक्षणिक नुकसान होत आहे. पण राजकीय मंडळी मात्र मूकपणे हे सर्व पाहत आहेत. याविषयी लेखक म्हणतो -''शिक्षण म्हणजे काय हेही न कळणारे लोक शिक्षणसंस्था मिळवितात आणि शिक्षणापेक्षा शिक्षकांच्या पगारापासून तर संस्थेला मिळणाऱ्या सरकारी मदती कशा लाटता येतील, याचेच ज्ञान अधिक मिळवतात. प्रमुख संचालकांच्या वैयक्तिक समृद्धीसाठी शिक्षणसंस्था असा विकृत सिध्दांत माझ्या समाजात रूढ झाला. याचे दुःख मला होऊ नये काय ? शिक्षण दिल्याने समाज सुधारतो की, शैक्षणिक संस्था दिल्याने ? सार्वजनिक जीवनातील कार्यकर्त्यांना आधार देण्यासाठी शिक्षणसंस्था असतील तर माझ्या समाजात काम करायला कार्यकर्त्यांना शिक्षण सोडून दुसरे क्षेत्र का दिसू नये ? कार्यकर्त्यापेक्षा पुढाऱ्यांनाच हे क्षेत्र आंधळेपण झाले असावे असे समजू नका. संस्था देऊन सुधारल्या गेलेले नेते कार्यकर्ते तांड्या-तांड्यावर आपला वचक ठेवतात आणि निवडणुकीच्या वेळी तो उपयोगी पडतो.''[१२३] अशा वर्तमान स्थितीवरचे हे भाष्य विचार करायला लावते. राजकीय पुढारी हे शिक्षणसंस्थेकडे उत्पन्नाचे साधन म्हणून पाहतो आहे. त्यासाठी आपल्या भोवतालच्या कार्यकर्त्याला तो आमीष दाखवतो आहे पण उद्याचे शैक्षणिक भवितव्य कसे असणार. याचा तीळमात्रही विचार राजकीय पुढारी करत नाहीत. एका अनुभवाचे चित्रण करताना लेखक म्हणतो-''आत्माराम, असं आहे आता तुझे लग्न झालेय. तू फार काळ माझ्या जवळ असाच कसा राहशील. मला जाणीव आहे. तर तुझ्या कायम उत्पन्नाचे साधन म्हणून तुला इथं एखादं कॉलेज काढून देतो त्याचा सर्वेसर्वा तू हो. मिळकतही तूच घे. फक्त माझे दिल्ली कार्यालय सांभाळ. या संकल्पित संस्थेसाठी आपण अवघ्या भारतातून पैसा आणू शकतो. बोल आहे तुला कबूल ?''

तांड्यातील माणसांच्या एकूणच जीवनाविषयीचा व 'स्व' जीवनाविषयीचा उद्वेग लेखकाने आपणास प्रस्तूत आत्मकथनामधून केलेला दिसून येतो. तर हा उद्वेग या व्यवस्थेविषयीचा आहे तर कधी हा उद्वेग या देशातील शासन पद्धतीविषयीचा आहे- 'कधी कधी तर मला वाटते, आपली राजवट कितीही जुलमी असली तरी ब्रिटिशांनी तांड्याचा आणखी आधार घेतला असता, तर त्यांची सत्ता आजवर टिकू शकली असती कदाचित निदान आजच्या या सवलतीसह लादल्या गेलेल्या

गुलामीपेक्षा ते पारतंत्र्य चांगले नव्हते काय?''

भटक्या-विमुक्तांच्या वाट्याला आलेली जीवनविषयक खंत आपणास 'तांडा' मधून दिसून येईल. लेखक लहान असताना वडील जातपंचायतीचे प्रमुख असताना त्या वेळेस लेखकालाही दारू प्यावी लागते. त्याविषयी प्रा.डॉ. सौ. आरती कुसरे-कुलकर्णी म्हणतात-''पंचायत ही या समाजात महत्त्वाची बाब आहे. बंजारा बोलीत त्याला 'नसाब' म्हणतात. 'नसाब' म्हणजे न्यायाधीशच तो लेखकाच्या 'बा'ला हे 'नसाब' पद होते. दंड झालेल्या पक्षाला पुन्हा 'ताजी हातभट्टी' आणण्याची शिक्षा असते आणि सर्वांना ती घ्यावी लागत असते. लेखकाला दूध पिण्याच्या वयात दारू प्यावी लागली आहे.''[१२६] तांड्यातील माणसाच्या वाट्याला आलेले जीवन हे किती दाहक स्वरूपाचे आहे. रतीमुळे मात्र लेखकाच्या जीवनाला वेगळे वळण लागले. रती ही लेखकाच्या जीवनातली मर्मबंधातली ठेव आहे. यानिमित्ताने एक उत्कट आणि नाजूक भावबंध उलगडत जाताना दिसते. तांड्यावर जन्माला आलेल्या लेखकाच्या शिक्षणाची धोर आबाळच झाली. पोटासाठी त्याला पुढे स्थायी नोकरीही करता आली नाही. छोट्या-मोठ्यां तात्पुरत्या नोकऱ्या करून, दूध वाटण्याचे काम करून उदरनिर्वाह केला. भोवतीच्या आगीत करपत गेलेला, जीवनाच्या सर्वच क्षेत्रात उपासमार झालेला, सर्वांगांनी परवड झालेला, आयुष्यभर परवड सहन करीत राहिलेला आणि कायम अस्थिर जीवन वाट्याला आलेला एक प्रतिभासंपन्न आपणास या तांड्यातून भेटत राहतो. त्याच्या जीवनाची शोकांतिका झाली. त्याला सतत मित्र आणि नातेवाईक यांच्यावरच विसंबून राहावे लागले. त्यामुळे लेखक आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत विस्कटत राहिला. लेखकाच्या शारीरिक भटकंतीपेक्षा मानसिक भटकेपणाचे दु:ख अधिक बोलके आहे. लेखक परिवर्तनवादी विचाराची कास धरून जीवनक्रमण करतो. त्यामुळे लेखकाच्या लेखनीतील वादळ तांड्याला कळू शकले नाही. यात्रा, सण-उत्सव, सत्यनारायण करणे अशा सर्वच धर्मभोळ्या गोष्टींचा प्रभाव या तांड्यावर आहे. तांड्यात राहणारी माणसे देव, धर्म, भूत, भाग्य यांच्या विळख्यात सापडल्याची अनेक उदाहरणे लेखक प्रसंगरूपाने देतो. आपला मुलगा साधू होणार याचा भाबड्या आईलाही गौरव वाटतो. समाजमनाला पोखरणाऱ्या अशा भाबडेपणाची असंख्य उदाहरणे 'तांडा'मध्ये आहेत. तांड्यातील व्यक्तीही विविधतेने नटलेल्या. आई, वडील, पत्नी, यशोदा, चपली काकू, पूनम, हाऱ्या, सुधीर, नीता, चीपसाहेब अशी खूप स्वभावचित्रे लेखकाने रेखाटली आहेत. ती सरस-सुरस उतरली आहेत. यातील काही स्वभावचित्रणाच्या माध्यमातून भूतकाळ उराशी कवटाळून तांडा कसा जगत राहिला हे लेखकाने नि:संकोचपणे वर्णिले आहे. हे सर्व लिहिण्याचे कारण म्हणजे लेखकाला समाजपरिवर्तनाचा लागलेला ध्यास. तांडा बदलावा, स्वतंत्र भारतात अजूनही आपण खितपत का पडलो आहोत याचा या माणसांनी विचार करावा. तांडा

जीवनातील या जगण्याने पेटून उठावा, त्याला आपल्या अस्तित्त्वाची जाणीव व्हावी, आपण उपरे नसून भूमिपुत्र आहोत हे 'तांडा'आपणास सतत सांगत राहील. लेखकाचे हे सांगणे सर्व भटक्या-विमुक्त जाती-जमातींनी गंभीरपणे ऐकण्याची आज गरज आहे.

**निष्कर्ष :**

१. 'तांडा' या आत्मकथनातून लेखकाने बंजारा लोकसंस्कृती आणि प्रवृत्तीचे यथायोग्य दर्शन घडविले आहे.

२. भटक्या-विमुक्तांच्या लोकरूढी, परंपरा, सन उत्सव, इ.च्या वेगळेपणाचे वैशिष्ट्य लेखकाने विविध घटना प्रसंगातून चित्रित केले आहे.

३. शिक्षण क्षेत्रातील भोंगळवादाचे आणि त्यातून होणाऱ्या पिळवणूकीचे चित्रण लेखकाने अत्यंत तटस्थपणे केले आहे.

४. तांड्याला प्राप्त झालेली राजकीय झालर तांड्याचेच कसे खलन करते हे लेखकाने अत्यंत यशस्वीपणे चित्रित केले आहे.

५. या आत्मकथनाचा लेखक परिवर्तनवादी विचाराची कास धरून जीवनक्रमन करताना दिसतो, हे आत्मकथनाचे सामर्थ्य आहे.

## संदर्भ सूची :-

१) आत्माराम कनीराम राठोड, 'तांडा', अभिजीत प्रकाशन, नागपूर-१९८९

२) डॉ. आरती कुसरे-कुलकर्णी, 'दलित स्वकथने : साहित्यरूप', विजय प्रकाशन, नागपूर

३) राममनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग', सुगावा प्रकाशन, पुणे -१९८९

४) रा. ग. जाधव, 'निळी क्षितिजे', अमेय प्रकाशन, नागपूर

५) डॉ. लीनकुमार बावणे, 'भटक्यांचा भग्नसंसार आणि संस्कृती', सुधीर प्रकाशन, वर्धा-२००५